# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार


पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
**Website- www.sic.maharashtra.gov.in**
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :११/२०२४/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| ॲड दिलावरखान पठाण,<br>रा. ऑफिस २१८-बी, मेघदूत शॉपिंग सेंटर,२ रा मजला, सी.बी.एस. जवळ, नाशिक, ता.जि. नाशिक-४२२००१. | उप अभियंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२००२. |

**<u>सुनावणी दिनांक १४/०७/२०२५</u>**

१) तक्रारदार यांनी दिनांक ०१/०१/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १४/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तर तक्रारदार व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक ०१/०१/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "द्वितीय अपील क्र. ४४४/२०२२ मध्ये मे. आयुक्त साहेबांनी दि. ०३/०८/२०२२ रोजी द्वितीय अपीलाची सुनावणी घेऊन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याने मे. आयुक्त साहेबांनी निकाल देऊन दि. ०६/०७/२०२१ च्या माहिती अर्जातील मुद्दयानुसार माहिती १५ दिवसात पुरविण्याचे आदेश दिले होते. तत्कालीन व विद्यमान माहिती अधिकारी यांनी दि. ०६/०७/२०२१ च्या अर्जान्वये माहिती मुदतीत पुरविण्याऐवजी माहिती लपविण्याचे प्रयत्न केले होते. मे. आयुक्तांनी आदेश देऊन देखील त्यांच्या आदेशाची कोणतीही अंमलबजावणी करुन गेली ०१ वर्ष सातत्याने माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न करुनही त्यांनी ती पुरविली नाही व माहिती देण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे. माहिती अधिकारी कलम २०(१) व (२) अन्वये शास्ती करण्याचे आदेश द्यावे व दंडात्मक शास्ती रु. २५,०००/- इतका दंड करण्यात यावा, गेली ०१ वर्ष माहिती पुरविली नसल्याने अतिरिक्त दंडात्मक शास्ती करण्यात यावी व त्याचे विरुध्द फौजदारी केस दाखल करण्याचे देखील आदेश द्यावेत म्हणून त्याचे विरुध्द कलम १८ माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत कायदेशीर तक्रार आहे. सबब तक्रारदारांना विनाविलंब न्याय मिळावा ही विनंती ही तक्रार."

३) तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ०६/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जांन्वये सन २०११ ते २०२१ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"(१) नाशिक महानगरपालिका हद्दीत गायी, म्हशी, गुरे, ढोरे, घोडे व इतर चतुष्पाद प्राण्यांच्या गोठयासाठी व तबेल्यासाठी आपल्या विभागातर्फे आरक्षणासंदर्भात सविस्तर व सुस्पष्ठ माहिती मिळावी. (२) नाशिक महानगरपालिकेच्या पुर्व, पश्चिम, पंचवटी, सातपूर, नाशिकरोड, नविन नाशिक या विभागीय क्षेत्रात अनाधिकृतपणे किती गोठे व तबेले कार्यरत आहे त्या संदर्भात सविस्तर माहिती मिळावी. (३) दुर्धर व घातक रोगांचा प्रार्दुभाव व गायी - म्हशी गुरे दोरे घोडे यांच्या शेणामुळे, मुत्रामुळे

होणाऱ्या भयंकर रोगाचा प्रार्दुभाव नाशिक महानगरपालिकेच्या परिसरात आपल्या विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे झाले आहे. अनधिकृत तबेल्या व गोठ्यामुळे निर्माण झाले असल्याने त्यांना शहराबाहेर हलविण्यासाठी नगररचना विभाग. यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी जावक क्रमांक आरोग्य/वशि/१३५७/२०११, दि.०६/०८/२०११ हे पत्र पाठवले होते त्या पत्रास अनुसरुन आजपर्यंत आपल्या विभागाने काय काय कारवाई केली त्याची सविस्तर तपशिलासह सुस्पष्ठ माहिती मिळावी. ४.) मुद्दा क्र.३ संदर्भात कारवाई करण्यासाठी आपल्या विभागाने कोणकोणत्या अधिकाऱ्यांना जबाबदारी सोपविली होती त्या अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम व सद्या नेमणुकीच्या ठिकाणासह सविस्तर माहिती मिळावी. (५) मुद्दा क्र.३ संदर्भात कारवाई करण्यास ज्या अधिका-यांना जबाबदारी सोपविली होती त्यांनी ती जबाबदारी का पार पाडली नाही या संदर्भात त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदया अंतर्गत काय कारवाई केली त्याची सविस्तर माहिती मिळावी. (६) मुद्दा क्र.३ अंतर्गत येणारे अनाधिकृत गोठे व तबेल्या विरुध्द आपल्या विभागाने केलेल्या आजपर्यत कायदेशीर कारवाईची माहिती मिळावी. (७) आपल्या विभागास सन २०११-२०१२ पासून अनाधिकृत व बेकायदेशीर गोठे तबेल्यांची परिशिष्ठ-१ (एकुण-१४ पाने) यादी सोबत जोडत आहे त्यांचे विरुध्द गेली ११ वर्षात काय कारवाई केली त्याची सविस्तर माहिती मिळावी."

४) आयोगाने द्वितीय अपील क्र. ४४४/२०२२/नाशिक संदर्भात आयोगासमोर दि. ०३/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १९/१०/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

> "*विद्यमान जन माहिती अधिकारी तथा* उप अभियंता, नगर नियोजन विभाग, नाशिक मनपा, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि. ०६/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन व्यक्तिशः मुद्देनिहाय विनामूल्य माहिती पुरवावी, जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत. तसेच अतिक्रमण विभागाकडून सदर माहिती प्राप्त करुन घेऊन देखील पुरवावी."

५) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी आयोगास दि. १४/०७/२०२५ रोजी अहवाल सादर केलेला आहे. मात्र सदर अहवालात आयोगाने द्वितीय अपिल क्र. ४४४/२०२२/नाशिक संदर्भात दि. १९/१०/२०२२ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार कोणती कार्यवाही केली याबाबतची कोणतीही वस्तुस्थिती नमूद केलेली नाही.

६) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, आयोगाने द्वितीय अपिल क्र. ४४४/२०२२/नाशिक संदर्भात दि. १९/१०/२०२२ अन्वये पारीत केलेल्या आदेशानूसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तक्रारदार यांना अद्यापपर्यंत आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी माहिती अवलोकनाची संधी दिल्याचे दिसून येत नाही. याबाबत नाशिक महानगरपालिका यांच्या नगरनियोजन विभाग, जाक्र/ननिवि/वशि/५५/२२०२ व दि. १५/०९/२०२२ अन्वये नाशिक महानगरपालिका हद्दीतील गोठयांचे बाबतीत माहिती दिल्याचे तक्रारदार यांनी माहिती आयोगाला सादर केले आहे. मागितलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्याने आयोगाने कलम ७(९) प्रमाणे माहिती न नाकारता अवलोकनाची संधी द्यावी म्हणून आदेशित केले आहे. त्यामुळे तक्रारदार यांच्या अन्य विनंती नाकारण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.



158

<u>आदेश</u>

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आयोगाने द्वितीय अपिल क्र. ४४४/२०२२/नाशिक संदर्भात दि. १९/१०/२०२२ अन्वये पारीत केलेल्या आदेशाची अंमजबजावणी करावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र. ११/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**प्रत:- प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक, ता. जि. नाशिक ४२२००२ यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांच्या आत सादर करावा.

जावक क्र ८३७८ 12 DEC 2025